आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता

१२ जुलै २०२५ - शनिवार

**<u>ठळक बातम्या</u>**

तरुणांना विकासाचं माध्यम बनवण्यासाठी रोजगार मेळावा हा सरकारच्या वचनबद्धतेचं प्रतिबिंब असल्याचं प्रधानमंत्र्यांचं प्रतिपादन/ देशभरातल्या ४७ ठिकाणी रोजगार मेळाव्यांमधून ५१ हजाराहून जास्त नियुक्तीपत्रांचं वाटप

अस्त्र या स्वदेशनिर्मित क्षेपणास्त्राची यशस्वी चाचणी

मराठ्यांच्या १२ गड किल्ल्यांना जागतिक वारसास्थळांच्या यादीत स्थान मिळाल्याबद्दल सर्वत्र आनंद

अहमदाबाद विमान अपघात प्रकरणी प्राथमिक तपास अहवाल प्रकाशित

**आणि**

विम्बल्डन टेनिस स्पर्धेत आज महिलांचा अंतिम सामना इगा श्वियांतेक आणि अमांडा अनिसिमोव्हा यांच्यात रंगणार

**<><><><>**

विकसित भारतासाठी तरुणांना सक्षम तसंच विकासाचं माध्यम बनवण्यासाठी रोजगार मेळावा हा सरकारच्या वचनबद्धचतेचं प्रतिबिंब असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मो◌ेदी यांनी म्हटलं आहे. देशभरात ४७ ठिकाणी आयोजित १६व्या रोजगार मेळाव्याला त्यांनी आज संबोधित केलं. यावेळी त्यांनी दूरदृश्यप्रणाली द्वारे विविध सरकारी विभागांत नव्यानं नियुक्त झालेल्या युवकांना ५१ हजारांहून अधिक नियुक्ती पत्रांचं वितरण केलं. नवीन भरती झालेल्या युवकांचं त्यांनी अभिनंदन केलं. सरकारच्या रोजगार मेळावा या उपक्रमामुळे लाखो तरुणांना केंद्र सरकारमध्ये कायमस्वरूपी नोकऱ्या मिळाल्या असल्याचं त्यांनी सांगितलं. देशात विकसित होत असलेल्या स्टार्टअप्स, नवोन्मेष आणि संशोधन या क्षेत्रांमध्ये वाढ होत असल्यामुळे देशातल्या तरुणांच्या क्षमता वाढत असल्याचं ते म्हणाले.

- **- होल्ड बाईट- PM- -**

खाजगी क्षेत्रात नवीन रोजगाराच्या संधी निर्माण करण्यावर सरकारचा भर असून सरकारनं रोजगाराशी संबंधित प्रोत्साहन योजना ही एक नवीन योजना मंजूर केली असल्याचं त्यांनी नमूद केलं. उत्पादन क्षेत्राला चालना देण्यासाठी या वर्षीच्या अर्थसंकल्पात

मिशन मॅन्युफॅक्चरिंगची घोषणा करण्यात आली असल्याचं मोदी म्हणाले. देशभरात रोजगार मेळाव्यांद्वारे आजवर १० लाखांहून अधिक नियुक्ती पत्रं जारी करण्यात आली आहेत.

केंद्रीय मंत्री पियुष गोयल यांनी मुंबईतल्या छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस इथून तर केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी नागपूर इथून या कार्यक्रमात भाग घेतला. पुण्यातल्या रोजगार मेळाव्यात नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या हस्ते नियुक्तीपत्रांचं वाटप करण्यात आलं. तामिळनाडू मध्ये पेरांबूरमधल्या एकात्मिक कोच फॅक्टरी इथं झालेल्या रोजगार मेळाव्यात केंद्रीय माहिती आणि प्रसारण राज्यमंत्री डॉ. एल. मुरुगन उपस्थित होते.

**<><><><>**

अस्त्र या स्वदेशनिर्मित क्षेपणास्त्राची यशस्वी चाचणी काल डीआरडीओ म्हणजेच संरक्षण संशोधन आणि विकास संस्था आणि भारतीय हवाई दलानं घेतली. ओडिशातल्या परीक्षण स्थळावरून या हवेतून हवेत मारा करू शकणाऱ्या क्षेपणास्त्राची चाचणी घेण्यात आली. या चाचणीदरम्यान वेगवेगळ्या पल्ल्यांच्या आणि उच्चगती मानवरहित हवाई लक्ष्यांवर प्रक्षेपण करण्यात आलं, असं संरक्षण मंत्रालयानं सांगितलं.

**<><><><>**

मराठा इतिहासात महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या १२ गड किल्ल्यांना युनेस्को-जागतिक वारसास्थळांच्या यादीत स्थान मिळाल्याबद्दल सर्वत्र आनंद व्यक्त होत आहे. यामुळे भारतातल्या जागतिक वारसास्थळांची संख्या आता ४४ झाली आहे. जागतिक वारसास्थळं समितीची ४७वी बैठक पॅरिसमधे काल झाली, त्यात हा निर्णय झाला. यामध्ये रायगड, राजगड, प्रतापगड, पन्हाळा, शिवनेरी, लोहगड, साल्हेर, सिंधुदुर्ग, विजयदुर्ग, सुवर्णदुर्ग, खांदेरी तसंच तामिळनाडूतला जिंजी या किल्ल्यांचा समावेश आहे.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी या निर्णयाबद्दल आनंद व्यक्त केला आहे. मराठा साम्राज्याची ओळख सुशासन, समाजकल्याण, लष्करी सामर्थ्य आणि सांस्कृतिक अभिमानाशी निगडित असल्याचं प्रधानमंत्र्यांनी म्हटलं आहे. केंद्रीय सांस्कृतिक कार्य मंत्री गजेंद्र सिंग शेखावत यांनी देखील या निर्णयाबद्दल समाधान व्यक्त केलं आहे. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि एकनाथ शिंदे यांनी या निर्णयाबद्दल आनंद व्यक्त केला आहे.

<><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून साकार झालेले उडान यात्री कॅफे लवकरच सुरू करणार असल्याची घोषणा केंद्रीय नागरी हवाई मंत्री के. राममोहन नायडू यांनी केली. देशात विमानसेवा वाढवण्यावर भर असल्याचंही त्यांनी सांगितलं. मुंबईत आयोजित पश्चिम क्षेत्र मंत्री परिषदेत ते बोलत होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय नागरी हवाई वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ हेही यावेळी उपस्थित होते. देशातलं सर्वोत्तम ऑफ शोअर एअरपोर्ट मुंबईत उभारणार असल्याची माहिती मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी दिली.

<><><><>

जम्मू काश्मीरमध्ये अमरनाथ यात्रेकरूंचा ११ वा जत्था जम्मूतल्या भगवती नगर यात्री निवासातून आज सकाळी रवाना झाला. या जत्थ्यात ६ हजार ६३९ यात्रेकरू आहेत. २७५ गाड्यांच्या ताफ्यात अत्यंत कडेकोट सुरक्षा व्यवस्थेत हा जत्था पुढे खोऱ्यातल्या बालताल आणि पहलगाम तळांच्या दिशेनं निघाला. आतापर्यंत सुमारे १ लाख ६३ हजार यात्रेकरुंनी अमरनाथ गुंफेपर्यंत पोहोचून दर्शन घेतलं आहे.

<><><><>

अहमदाबादमध्ये गेल्या महिन्यात झालेल्या एअर इंडिया विमान अपघात प्रकरणी विमान अपघात तपास यंत्रणेनं काल १५ पानांचा प्राथमिक अहवाल प्रकाशित केला आहे. उड्डाण सुरू झाल्यानंतर काही सेकंदातच विमानाचं इंजिन इंधन नियंत्रण 'RUN' मोड वरून 'CUTOFF' स्थितीत गेलं आणि बंद झालं, परिणामी ही दुर्घटना घडली असं या अहवालात म्हटलं आहे. या अपघातात २६० जणांचा मृत्यू झाला.

<><><><>

विम्बल्डन टेनिस स्पर्धेत आज महिलांचा अंतिम सामना ५ वेळा ग्रँडस्लॅम जिंकणारी पोलंडची इगा श्वियांतेक आणि १३वी मानांकित अमांडा अनिसिमोव्हा यांच्यात रंगणार आहे. भारतीय वेळेनुसार सामना रात्री साडेआठला सुरु होईल.

पुरुषांच्या स्पर्धेत अव्वल मानांकित यानिक सिनरने काल नोव्हाक जोकोविचचा पराभव करुन अंतिम फेरीत धडक मारली. त्याचा सामना उद्या द्वितीय मानांकित कार्लोस अल्काराझ बरोबर होईल.

<><><><>

भारत-इंग्लडदरम्यान अँडरसन-तेंडुलकर कसोटी क्रिकेट स्पर्धेत तिसऱ्या सामन्यात चुरस निर्माण झाली आहे. लंडनच्या लॉर्ड्स मैदानावर यजमान इंग्लंडविरुद्ध दुसऱ्या दिवशी भारताने 3 बाद 145 धावा केल्या. इंग्लंडचा संघ पहिल्या डावात 387 धावांवर सर्वबाद झाला. जसप्रीत बुमराहने पाच गडी बाद केले आणि विक्रमाची नोंद केली. पाच सामन्यांची कसोटी मालिका सध्या 1-1 अशी बरोबरीत आहे.

**<><><>**

झारखंड मध्ये रांची इथं आयोजित १५ व्या हॉकी इंडिया उपकनिष्ठ महिला राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धेत काल हरियाणा, ओडिशा, मिझोराम आणि झारखंड संघांनी उपांत्य फेरीत प्रवेश केला. शेवटच्या आठ सामन्यांमध्ये, हरियाणाने उत्तर प्रदेशचा १-०, ओडिशाने बिहारचा ५-०, मिझोरामने पंजाबचा ४-० आणि झारखंडने मध्य प्रदेशचा ५-४ असा पराभव केला. उपांत्य फेरीत, हरियाणाचा सामना ओडिशाबरोबर होईल, तर मिझोरामचा आज झारखंडशी सामना होईल.

**<><><>**

जागतिक शांतता आणि सुरक्षिततेसाठी दहशतवाद विरोधी संयुक्त कार्यगटांच्या माध्यमातून २६ देशांना सहभागी करून घेत भारतानं दहशतवादाला आळा घालण्याचे आपले प्रयत्न आणखी मजबूत केले आहेत. परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाच्या वर्ष २०२४ च्या वार्षिक अहवालात ही माहिती दिली आहे. या धोरणात्मक संवादांच्या माध्यमातून दहशतवादाच्या वाढत्या धोक्याचा सामना करण्यासाठी आंतरराष्ट्रीय सहकार्य वाढवण्यात भारताची सक्रिय भूमिका अधोरेखित होते. बीजिंग इथं शांघाय सहकार्य संघटना परिषदेच्या प्रादेशिक दहशतवाद विरोधी कार्यवाहीसाठी कायदेशीर तज्ज्ञगटाच्या बैठकीतही भारतानं सहभाग घेतला.

**<><><>**

रशियाचे परराष्ट्र मंत्री सर्जेई लॅवरॉव्ह उत्तर कोरियाच्या दौऱ्यावर असून दोन्ही देशांदरम्यान द्विपक्षीय भागीदारी मजबूत करण्यासाठी ते उत्तर कोरियाचे परराष्ट्र मंत्री चोए सॉन हुई यांच्याशी चर्चा करणार आहेत.

**<><><>**

पूर्व राजस्थान आणि मध्य प्रदेशात आज जोरदार ते मुसळधार पावसाचा अंदाज भारतीय हवामान विभागानं व्यक्त केला आहे. आसाम, मेघालय, छत्तीसगड, कर्नाटकचा किनारपट्टी भाग, गुजरात, हिमाचल प्रदेश, केरळ, माहे, उत्तर प्रदेश, उत्तराखंड आणि पश्चिम महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी जोरदार पाऊस होईल असा विभागाचा अंदाज आहे.

येत्या ४-५ दिवसांत देशाच्या मध्य तसंच लगतच्या वायव्य भागात जोरदार ते मुसळधार पावसाची शक्यता असल्याचं हवामान विभागानं म्हटलं आहे. याकाळात आंध्र प्रदेश, तामिळनाडू, पुद्दुचेरी आणि कराईकल इथं तुरळक ठिकाणी हवामान उष्ण आणि दमट राहील असा अंदाज हवामान विभागानं व्यक्त केला आहे.

**//<><><><>//**